# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १६/०४/२०१७

## *गडचिरोली जिल्हा पोलीस भरती- २०१७ मध्ये १६९ जागेसाठी ३१५१ उमेदवारांनी दिली लेखी परिक्षा*

गडचिरोली पोलीस शिपाई पदाच्या १६९ जागांकरीता आज दिनांक १६/०४/२०१७ रोजी लेखी परिक्षा घेण्यात आली. सदर भरती प्रक्रियेमध्ये विविध प्रवर्गातील शारिरीक व मैदानी चाचणीमध्ये पात्र महीला/पुरुष उमेदवारांपैकी १:१५ याप्रमाणे २८१८ पुरुष व ७६० महीला असे एकूण ३५७८ उमेदवारांना लेखी परिक्षेची संधी देण्यात आली होती. त्यापैकी ३१५१ उमेदवारांनी परिक्षेस हजेरी लावली तर ४२७ उमेदवार अनुपस्थित होते. सदर लेखी परिक्षा कवायत मैदान, पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे घेण्यात आली असून परिक्षेकरीता उमेदवारांना लेखणी पॅड व बॉल पेन पोलीस विभागामार्फत पुरविण्यात आले. उन्हाची तीव्रता लक्षात घेवून परिक्षा ही सकाळी ०७.०० ते ०८.३० वाजताच्या दरम्यान घेण्यात आली.

संपूर्ण परिक्षा प्रक्रिया अतिशय पारदर्शक ठेवण्याच्या दृष्टिने उमेदवारांची तपासणी तसेच पुर्ण वेळ व्हिडीओ रेकॉर्डीगची व्यवस्था परिक्षा केंद्रावर करण्यात आली होती तसेच उमेदवारांकरीता तात्काळ वैदयकिय मदतीची व्यवस्थाही परिक्षा केंद्रावर उपलब्ध होती. एकंदरीत पोलीसांच्या चोख बंदोबस्तात सर्व परिक्षार्थी उत्साहाने परिक्षेस सामोरे गेले.









